# मिरा भाईंदर महानगरपालिका

कार्यालय:- डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, नगरभवन, मांडली तलाव, तळ मजला, भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे-४०११०१, दुरध्वनी क्र. ०२२-२८१९२८२८/२८१९३०२८
ई-मेल:moh@mbmc.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## सार्वजनिक आरोग्य विभाग

जा.क्र.मनपा/सार्व.आ.वि./२२३/२०२३-२४

दिनांक : ०३/ ०५ /२०२३.

प्रति,

१. जनसंपर्क अधिकारी
२. सिस्टम मॅनेजर
मिरा भाईंदर महानगरपालिका.

**विषय :- महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर व वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेबाबत.**

उपरोक्त विषयान्वये कोविड-१९ अंतर्गत एकत्रित ठोक मानधन तत्वावर कंत्राटी पध्दतीने निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात "बायोमेडिकल इंजिनियर" हे पद भरणेकामी मा. आयुक्त यांची मंजुरी प्राप्त झालेली आहे.

तरी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर व वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात यावी.

सोबत जाहिरातीचा मसुदा जोडलेला आहे.

(डॉ. नंदकिशोर लहाने)
**वैद्यकीय आरोग्य अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

कार्यालय:- डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, नगरभवन, मांडली तलाव, तळ मजला, भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे-४०११०१, दुरध्वनी क्र. ०२२-२८१९२८२८/२८९३०२८
ई-मेल:moh@mbmc.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## सार्वजनिक आरोग्य विभाग

दिनांक:- ०२/०५ /२०२३.

जा.क्र.मनपा/सार्व.आ.वि./२९६ /२०२३-२४

## // जाहिरात //

**विषय : कोरोना विषाणू (कोविड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेत बायोमेडिकल इंजिनियर पदाची एकत्रित ठोक मानधन तत्वावर कंत्राटी पध्दतीने आवश्यकतेनुसार नेमणूक करणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोरोना विषाणू (कोविड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेतंर्गत महानगरपालिका क्षेत्रात DCHC/ DCH, RT-PCR लॅब व लिक्विड ऑक्सिजन टँक उभारण्यात आले आहेत. तसेच या ठिकाणी असणाऱ्या वैद्यकीय उपकरणांची देखरेख, दुरुस्ती व हाळणेकामी बायो मेडिकल इंजिनियर पदाची जाहिरात प्रसिद्ध करुन इच्छुक व पात्र उमेदवारांची निवड करणेकामी अर्ज मागविण्यात येत आहेत.

खालील नमुद केलेली शैक्षणिक अर्हता व पात्रता धारण करणाऱ्या तसेच इतर अटींची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांनी, विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक त्या गुणपत्रके व प्रमाणपत्रांच्या स्व-साक्षांकित प्रतींसह दि.१०/०५/२०२३ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत ऑफलाईन पध्दतीने सार्वजनिक आरोगय विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, नगरभवन, मांडली तलाव, तळ मजला, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे-४०११०१ येथे अर्ज सादर करावा. पात्र उमेदवारांची प्रारुप गुणवत्ता यादी तयार करुन पद आवश्यकतेनुसार खालील नमुद अटींशर्तींच्या अधिन राहून प्रारुप यादीमधून ठोक मानधन तत्वावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पद्धतीने आवश्यतेनुसार नेमणूक करण्यात येणार आहेत.

| अ.क्र. | पदनाम | शैक्षणिक पात्रता | अनुभव | एकत्रित मासिक ठोक मानधन | एकूण पदांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | बायोमेडिकल इंजिनियर | मान्यता प्राप्त विद्यापीठ/संस्थेतून बायोमेडिकल इंजिनियर विषायाची पदवी प्राप्त. | संबधित क्षेत्रात काम केल्याचा अनुभव असल्यास प्राधान्य. | रु. ३०,०००/- | १ |

**अटी व शर्ती :-**

१. सदर जाहिरातीच्या अनुषंगाने प्राप्त अर्जांच्या छाननीअंती प्रारुप गुणवत्ता यादी तयार करुन आवश्यकतेप्रमाणे म्हणजेच महानगरपालिकेला गरज भासेल त्याप्रमाणे प्रारुप गुणवत्ता यादीमधुन मासिक ठोक मानधन तत्वावर कंत्राटी स्वरुपाने आवश्यकतेनुसार नियुक्ती आदेश देण्यात येतील.

२. सदर जाहीरातील पदसंख्या अथवा इतर बाबींमध्ये बदल करणे अथवा जाहिरातीनुसार होणाऱ्या भरती प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा बदल करणे अथवा जाहिरातीनुसार होणारी भरती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता रद्द करणे याबाबतचे सर्व अधिकार आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांना असतील.

३. उपरोक्त पदांकरीता कालावधी प्रथमत: ३ महिने किंवा कोरोना (कोविड-१९) चा प्रादुर्भाव संपेपर्यंत, जे आधी घडेल तो पर्यंत असेल. तसेच आवश्यकतेप्रमाणे १ दिवस सेवा खंड करुन पुर्ननियुक्ती देण्यात येईल.

४. वयोमर्यादा ६० वर्षांपर्यंत.

५. सदरची नेमणूक तात्पुरती असल्याने उमेदवारांची निवड स्थानिक परिस्थिती व गरजेनुरुप करण्यांत येणार आहे. याबाबत कोणतीही विचारणा दुरध्वनीवर करण्यांत येऊ नये.

६. नियुक्त उमेदवारांना कोविड-१९ रुग्णांची सेवा करणे अनिवार्य राहील.

७. वरील पदे ही संपुर्णपणे मासिक ठोक मानधन तत्वावर कंत्राटी स्वरुपाचे असल्याने या पदावर कायमस्वरुपाची नियुक्ती मागण्याचा हक्क असणार नाही.

८. सदर पदाच्या कंत्राटी नेमणुका वस्तुनिष्ठ मूल्यांकन (Objective assessment) पध्दतीने पदाची शैक्षणिक अर्हता व अनुभव विचारात घेऊन करण्यांत येतील.

९. निवड झालेल्या उमेदवारांनी पात्रता व अनुभवाच्या मुळ कागदपत्रांसह एक पासपोर्ट आकाराचा फोटो व आवश्यक मुळ कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रतीचा एक संच घेऊन नियुक्तीसाठी हजर राहणे आवश्यक आहे.

१०. विहित पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज, पुर्ण किंवा चुकीचे भरलेले अर्ज, वय, शैक्षणिक अर्हता, गुणपत्रक, अनुभव इत्यादी संदर्भातील आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित सत्यप्रती (True copy) जोडलेले नसलेले अर्ज अपात्र समजण्यात येतील.

११. प्रारुप गुणवत्ता यादी (Draft List) मधून नियुक्ती करण्यात येणाऱ्या उमेदवारांना नियुक्ती आदेश दिल्यानंतर ०३ दिवसांच्या आत रुजू होणे आवश्यक राहील.

१२. वरील पदासाठी कामाचे स्वरुप ठरविण्याचे अधिकार वैद्यकीय आरोग्य अधिकारी / विभाग प्रमुख यांना राहतील.

१३. सदर पदांना दररोज किमान आठ तास (रुग्णालयाच्या सोईनुसार) सेवा देणे बंधनकारक असेल. तथापि, कोविड-१९ चा प्रादुर्भाव विचारात घेता अत्यावश्यक सेवा असल्याने आवश्यकतेप्रमाणे जादाचे कामकाज करावे लागेल व त्याचे अतिरिक्त मानधन अदा करण्यात येणार नाही. पदांची कामकाजाची वेळ निश्चित करण्याचे अधिकार विभाग प्रमुख यांचे असतील.

१४. अपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१५. सदरची नियुक्ती ही ठोक मानधन तत्वावर कंत्राटी स्वरुपाची व कोविड-१९ साथरोग कालावधीसाठी आहे. साथरोगाचा प्रादुर्भाव संपल्यानंतर त्यांची नियुक्ती संपुष्टात आणण्यात येईल. त्यापुढे त्यांना मिरा भाईंदर महानगरपालिका सेवेत सामावून घेण्याबाबत किंवा भविष्यात कायम स्वरुपी नोकरी मागण्याचा हक्क राहणार नाही.

१६. पात्र उमेदवारास नियुक्ती देणेबाबतचे सर्व अधिकार मा. महापालिका आयुक्त यांनी स्वतःकडे राखुन ठेवले आहेत. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

१७. उमेदवाराला नियुक्तीनंतर राजीनामा द्यावयाचा असल्यास किमान १५ दिवसांची लेखी नोटीस द्यावी लागेल अन्यथा त्या महिन्याचे मानधन अदा केले जाणार नाही.

१८. संशयास्पद सचोटी, गैरवर्तवणुक/अशोभनीय वर्तन, वरीष्ठाची दिशाभुल करणे, गैरहजर राहणे, आदेशाचे पालन न करणे याबाबत कोणतीही पुर्वसुचना न देता सेवा संपुष्टात आणली जाईल.

१९. वेळोवेळी लागू करण्यात येणाऱ्या इतर अटी/शर्ती संबधितांना लागू राहतील. तसेच उमेदवाराचे काम समाधानकारक नसल्यास कोणत्याही टप्प्यावर उमेदवारांची सेवा समाप्त करण्याचे अधिकार मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना राहतील.

२०. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार अर्हता धारण करणारा न आढळल्यास, गैरवर्तन व दबावतंत्राचा वापर करताना आढळल्यास त्याची उमेदवारी आपोआप रद्दबातल होईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

२१. विहित मुदतीत विहित नमुन्यात (मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वेबसाईटवर उपलब्ध असलेल्या अर्जाचा नमुना) अर्ज प्राप्त न झाल्यास असे अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाहीत यांची स्पष्ट नोंद घ्यावी.

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने.**

**(संजय शिंदे)**
उप-आयुक्त (वैद्यकीय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

## अर्जाचा नमुना

(पदाचे नांव :- ........................................................ पदांचा सांकेतिक क्र. ................. )

प्रति,
**मा. उप-आयुक्त (सार्व. आरोग्य)**
मिरा भाईंदर महानगरपालिका
स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.)
ता. जि. ठाणे. :- ४०१ १०१.

फोटो

(१) संपुर्ण नांव : मराठी इंग्रजी (कॅपिटल लेटर)

| | | | मराठी | इंग्रजी (कॅपिटल लेटर) |
|---|---|---|---|---|
| १. | **आडनांव** | : | ........................................ | ........................................ |
| २. | **स्वत:चे नांव** | : | ........................................ | ........................................ |
| ३. | **वडिलांचे/ पतीचे नांव** | : | ........................................ | ........................................ |

(२) **पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता (पिन कोडसहित)** : ....................................................................................
....................................................................................
....................................................................................
....................................................................................

**संपर्कासाठी दूरध्वनी क्रमांक** : ....................................................................................

(३) **अ) जन्मतारीख** :

| **तारीख** | | **महिना** | | **वर्ष** | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

**ब) जाहिरात प्रसिध्द झालेल्या दिनांक रोजीचे वय** ..........................**वर्ष**..........................**महिने**............**दिवस**

(४) **राष्ट्रीयत्व** : **भारतीय/अभारतीय**

(५) **शैक्षणिक अर्हता :**

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेली परीक्षा | मंडळ/ विद्यापीठाचे नाव | परीक्षा प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |

(६) **अनुभव:**

| संस्थेचे नाव व पत्ता | कालावधी | | एकुण वर्ष | सेवा सोडण्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| | पासून | पर्यंत | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

(७) **अर्जासोबत खालील (छायांकित) सत्यप्रती जोडलेल्या आहेत.**

१) गुणपत्रिका २) पदवी उत्तीर्ण प्रमाणपत्र ३) नोंदणी प्रमाणपत्र ४) अनुभव कागदपत्रे

**अर्जदाराची सही/-**

**ठिकाण** :-

**दिनांक** :-